Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १७० • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.२० मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

# १४ तासांच्या प्रतीक्षेनंतर राज ठाकरे-अमित शहांचे मनोमिलन

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)–महाराष्ट्र निर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी १४ तास दिल्लीत ताटकळत काढल्यानंतर मंगळवारी दुपारी साडेबारानंतर अखेर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये अर्धातास चर्चा झाली. राज ठाकरे यांनी बैठकीबाबत काहीही सांगण्यास नकार दिला असला तरी, आगामी लोकसभा निवडणुकीसाठी 'मनसे' सत्ताधारी महायुतीमध्ये सहभागी होण्याची शक्यता आहे. त्यासंदर्भातील घोषणा मुंबईमध्ये केली जाऊ शकते.**




## दक्षिण मुंबईत वर्चस्वाची लढाई ?

महायुतीत मनसेचा अधिकृतपणे अजून समावेश झालेला नसला तरी, मनसेला दक्षिण मुंबईचा लोकसभा मतदारसंघ सोडला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या मतदारसंघांमध्ये सलग दोन वेळी ठाकरे गटाचे अरविंद सावंत विजयी झाले होते. इथून भाजपचे नेते व विद्यमान विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या नावाचीही चर्चा केली जात आहे. मात्र, हा मतदारसंघ मनसेला मिळाला तर शिवसेना–ठाकरे गट व मनसे अशी थेट लढत होण्याची शक्यता असून दोन्ही पक्षांसाठी ही वर्चस्वाची लढाई ठरण्याची शक्यता आहे.

२०१९ मध्ये राज ठाकरे यांच्या मनसेने लोकसभेची निवडणूक लढवली नव्हती. मात्र, त्यावेळी त्यांनी महाराष्ट्रभर पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपविरोधात जोरदार प्रचार केला होता. राज ठाकरे यांच्या 'लाव रे तो व्हीडिओ' हे विधान कमालीचे चर्चेत होते. मात्र, पाच वर्षांनंतर राज्यातील राजकीय परिस्थिती बदलली असून राज ठाकरे यांनीही राजकीय भूमिका बदलली आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे आता पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपला मदत करण्याची शक्यता निर्माण झाली आहे.मुंबईमध्ये राज ठाकरे यांची प्रदेश भाजपच्या नेत्यांनी भेट घेतली होती. त्यानंतर सोमवारी रात्री दहाच्या सुमारास राज ठाकरे त्यांचे पुत्र अमित ठाकरे यांच्यासह दिल्लीत येऊन दाखल झाले. राज ठाकरे प्रमुख्याने महाराष्ट्र व मराठी माणसाचे राजकारण करत असल्याने ते फार क्वचित दिल्लीत येऊ राजकीय भेटीगाठी घेतात. यावेळी ते भाजप नेत्यांच्या सांगण्यावरून दिल्लीत आले एवढेच नव्हे तर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी वेळ देईपर्यंत दिल्लीत मुक्काम करून राहिले. सोमवारी रात्री पंचतारांकित हॉटेलमध्ये वास्तव्य करणारे राज ठाकरे यांनी 'या म्हणून सांगितले म्हणून आलो', असे पत्रकारांना सांगितले होते. ठाकरे सोमवारी रात्रीच शहांची भेट घेणार होते. मात्र, शहांच्या भरगच्च पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे दोन्ही नेत्यांची भेट मंगळवारी दुपारी साडेबारानंतर झाली. राज ठाकरे यांच्यासोबत भाजपचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे हेही होते. शहा व ठाकरे यांची भेट अत्यंत सकारात्मक झाल्याचे सांगितले. या भेटीनंतर राज ठाकरे थेट मुंबईला निघून गेले.महाविकासातील प्रामुख्याने शिवसेना– उद्धव ठाकरे गटाच्या मतांच्या विभागणीसाठी मुंबई, उत्तर महाराष्ट्र आदी काही भागांमध्ये राज ठाकरे यांच्या मनसेचा लाभ मिळू शकतो, असे गणित भाजपने मांडले आहे. मुंबईमध्ये शिवसेना–ठाकरे गटाच्या मराठी मतांची विभागणी करण्याचा भाजपचा हेतू असल्याचे मानले जात आहे. त्यासाठी भाजपने राज ठाकरे यांची मनधरणी केल्याचे सांगितले जाते.२०१९च्या लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे यांच्या मनसेने लोकसभेची निवडणूक लढवली नव्हती. मात्र, ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१९ मध्ये विधानसभेच्या निवडणुकीत मनसेने १०१ जागा लढवल्या होत्या. त्यातील १ जागा जिंकली होती. मनसे १० उमेदवार दुसऱ्या तर २५ उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर राहिले होते. मनसेला २.३ टक्के मते मिळाली होती. तसेच, २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत मनसेने १० जागा लढवल्या होत्या. त्यांच्या एकही उमेदवार विजय होऊ शकला नव्हता. ९ उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर राहिले होते. २०१४ मध्ये मनसेला १.५ टक्के मते मिळाली होती. भाजपला २०२४च्या लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रातून अधिकाधिक जागा जिंकाव्या लागतील. त्यामुळे मनसेची अडीच टक्के मतेही महत्त्वाची ठरणार आहेत. या मतांसाठी भाजप राज ठाकरे यांच्या मनसेला महायुतीत सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करत असल्याचे सांगितले जाते.

# भाजपऐवजी मविआसोबत यावे धाडसीपणाने लढणाऱ्या नेत्यांनी अशी भूमिका घेणे योग्य नाही

## रोहित पवारांची राज ठाकरेंना ऑफर



**नाशिक (वृत्तसंस्था)–**मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे महायुतीत सामील होणार अशा चर्चा सुरू आहेत. यावर राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. धाडसीपणाने लढणाऱ्या नेत्यांनी भाजपसोबत जाऊ नये. मी देखील राज ठाकरे यांच्या भाषणांचा फॅन आहे. त्यांनी मविआ सोबत यावं ही इच्छा आहे असे रोहित पवार म्हणाले.

यावेळी बोलतांना ते म्हणाले, ''२०१९ प्रमाणे एकत्र येऊन भाजपाविरोधात लढलो तर राज ठाकरेंबद्दलची आपुलकी वाढेल. ते धाडसी आणि लढणारे नेते आहेत. आज लढायची परिस्थिती असताना भाजपाबरोबर न जाता आपण एकत्र येऊन लढले पाहिजे. राज्यात मत विभाजन करण्यासाठी भाजपने छोटे मोठे पक्ष फोडण्याची रणनीती अवलंबली आहे'', असा आरोप रोहित पवारांनी केला.तसेच पुढे ते म्हणाले, ''ईडी आणि विविध संस्थांना घाबरून एखादा नेता त्यांची भूमिका बदलत असेल तर योग्य नाही. आज लोकांना लढणारे नेते पाहिजेत. महाराष्ट्राच्या हितासाठी सामान्य लोकांच्या वतीने महाशक्तीच्या विरोधात जो लढेल तो लोकांच्या मनात बसणार आहे. तसेच महाराष्ट्राच्या बाजूने लढणं महत्त्वाचे आहे'', असे रोहित पवार यांनी म्हंटले आहे.दरम्यान, राज ठाकरेंनी महाविकास आघाडीत यावे असे वाटत असेल तर त्यांना आधी ऑफर का दिली नाही? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता रोहित पवार म्हणाले, ऑफर देणारा मी कोण आहे. माझं एकच मत आहे की त्यांनी पुढाकार घेऊन चर्चा करणं गरजेचे आहे. नेत्यांबरोबर चर्चा झाली असेल की नाही माहित नाही. झाली असेल तर ती चर्चा पुढे जायला हवी'', असंही रोहित पवार म्हणाले.दरम्यान, मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे गेल्या चार दिवसांत दुसऱ्यांदा दिल्लीत दाखल झाले आहेत. आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत त्यांची बैठक होणार आहे. भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीत मनसेला घेण्याच्या निर्णयावर जवळपास सर्व मित्रपक्षांचे एकमत झाल्याची माहिती आहे. त्यामुळे आता मनसे महायुतीत सामील झाली तर महाविकास आघडीला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे.

# विदर्भात पुढील दोन दिवस गारपिटीचा इशारा मराठवाड्यातही कोसळणार पावसाच्या सरी

**पुणे (वृत्तसंस्था)–**२ दिवसांपूर्वी विदर्भात अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. मात्र आता आणखी दोन ते तीन दिवस विदर्भात अवकाळी पावसाचे सावट कायम आहे. एवढेच नव्हे तर काही जिल्ह्यांत गारपिटीचा इशाराही हवामान खात्याने दिला आहे. राज्यातील उर्वरित भागांत तापमानाचा पार वाढत आहे. अनेक ठिकाणी तापमान चाळीशीच्या पुढे गेले आहे. मात्र विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत अवकाळी पावसाची शक्यता असल्याचे हवामान खात्याने म्हंटले आहे. तसेच विदर्भात ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहतील.

गेल्या दोन ते तीन दिवसांपासून विदर्भासह मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाच्या सरी कोसळत आहे. हवामान खात्याने मंगळवारी आणि बुधवारी वादळी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. बुलडाणा, अकोला, अमरावती, वाशीम, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, नांदेड, लातूर या जिल्ह्यांना वादळी पावसासह गारपिटीचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यांना वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.दरम्यान, विदर्भ आणि परिसरावर समुद्रसपाटीपासून १.५ किलोमीटर उंचीवर चक्राकार वारे वाहत आहेत. या चक्राकार वाऱ्यांपासून दक्षिण तमिळनाडू पर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. यामुळे रविवारी विदर्भ, मराठवाड्यात ढगाळ हवामानासह वादळी पाऊस गारपिटीने हजेरी लावली.सोमवारी सकाळपर्यंतच्या २४ तासांत सोलापूर येथे राज्यातील उच्चांकी ३९.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर वाशीम येथे पारा ३९ अंशांपार कायम आहे. उर्वरित राज्यात उन्हाचा चटका कायम असला तरी तापमानात चढ–उतार सुरूच आहेत. त्यातच पावसाची उघडीप असलेल्या भागात उन्हाची ताप कायम राहण्याची शक्यता आहे.

# ठाकरे दिल्लीत तर अजित पवार फडणवीसांच्या बंगल्यावर:राज्यातील राजकारणाला वेग

**मुंबई (वृत्तसंस्था)–**आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडींना वेग आला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे दिल्लीत अमित शहा यांची भेट घेत आहे तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार हे देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर दाखल झाले आहेत. लोकसभा निवडणुकीत महायुतीतील जागा वाटपाचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. त्यामुळे अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्यातील ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.





लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षाला किती जागा मिळते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जास्तीत जास्त लाढण्याचा भाजप प्रयत्न करत असून त्यामुळे एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या पक्षांना कमी जागा मिळण्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे. त्यातच आता महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा नवा पक्ष देखील महायुतीमध्ये सामील होत आहे. त्यामुळे या पक्षाला देखील एक किंवा दोन जागा जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचा वाटा आणखी कमी होणार आहे. त्यामुळेच अजित पवार हे उपमुख्यंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करण्यासाठी त्यांच्या सागर या बंगल्यावर दाखल झाले असल्याचे बोलले जात आहे.मुख्यमंत्री अजित पवार यांच्याबरोबरच भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार हे देखील देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी दाखल झाले आहेत. या चारही नेत्यांमध्ये आगामी काळात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या जागा वाटपात बाबत सविस्तर चर्चा सुरू आहे. मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी मुंबईमधील सर्व खासदारांची बैठक बोलावली आहे. या बैठकीच्या आधीच त्यांनी फडणवीस आणि अजित पवार यांची भेट घेऊन चर्चा केली. त्यामुळे जागा वाटपाचा निर्णय अंतिम टप्प्यात असल्याचे संकेत मिळत आहेत.

# अजित पवार विरुद्ध शरद पवार याचिकेत दोघांना दिलासा

**मुंबई (वृत्तसंस्था)–**सर्वोच्च न्यायालयाने शरद पवार विरुद्ध अजित पवार यांच्या याचिकेवर दोन्ही गटाला दिलासा देत महत्त्वाचा निर्णय दिला आहे. निवडणूक आयोगाने शरद पवार यांच्या गटाला दिलेले तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह लोकसभा आणि नंतर विधानसभा निवडणुकीपर्यंत कायम ठेवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. तर अजित पवार यांच्याकडे असलेलले घड्याळ हे निवडणूक चिन्ह या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत कायम राहणार आहे. त्यामुळे आता अजित पवार आणि शरद पवार या दोन्ही गटाला सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला असल्याचे बोलले जात आहे.राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर अजित पवार गटाला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नाव आणि घड्याळ हे निवडणूक चिन्ह निवडणूक आयोगाच्या वतीने देण्यात आले आहे. निवडणूक आयोगाच्या या निर्णयाविरोधात शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. आज या प्रकरणाची सुनावणी झाली. मागील वेळी म्हणजेच १४ मार्च रोजी झालेल्या सुनावणीत शरद पवार यांचा फोटो वापरण्यावरून सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला फटकारले होते. तसेच असे अशा पद्धतीने शरद पवार यांचा फोटो वापरणार नाही, असे शपथपत्र देण्याचे आदेश देखील दिले होते. या सर्व प्रकरणामुळे आज सर्वोच्च न्यायालय काय निर्देश देते, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने दोन्ही गटाला दिलासा दिला आहे.अजित पवार गटाच्या विरुद्ध शरद पवार गटाने दाखल केलेल्या याचिकेवर १४ मार्च रोजी सुनावणी झाली होती. अजित पवार यांचा गट शरद पवार यांचा फोटो वापरत असल्याचे शरद पवार गटाच्या वतीने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले होते. यावर सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला चांगलेच फटकारले होते. तसेच आम्ही शरद पवार यांचा फोटो वापरणार नाही, असे शपथपत्र देण्याचे निर्देश देखील अजित पवार गटाला दिले होते. तसे शपथपत्र शनिवारी म्हणजेच १६ मार्च रोजी अजित पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात सादर केले आहे.



मात्र, गेल्या सुनावणी दरम्यान न्यायालयाने घड्याळ हे निवडणूक चिन्ह बदलून दुसरे चिन्ह का वापरत नाही? असा तोंडी प्रश्न अजित पवार गटाला विचारला होता. त्यावेळी न्यायालयाने या संदर्भात कोणतेही निर्देश दिले नव्हते. तसेच शरद पवार यांचे तुतारी वाजवणारा माणूस हे निवडणूक चिन्ह केवळ राज्यसभा निवडणुकीपुरते देण्यात आल्याचा दावा अजित पवार गटाने केला होता. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने या दोन्ही गटाचे निवडणूक चिन्ह सध्यातरी कायम ठेवले आहे.अजित पवार यांना निवडणूक आयोगाच्या वतीने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हे नाव तसेच घड्याळ हे निवडणूक चिन्ह मिळाले असले तरी सर्वोच्च न्यायालयातील लढाई अजूनही सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला शरद पवार यांचा फोटो वापरण्यावरून फटकारले आहे. त्यातच निवडणूक चिन्हाबाबत जर सर्वोच्च न्यायालयाने काही निर्णय दिला नसला तरी त्यासाठी भविष्यात निकालावर हे अवलंबून ठेवले आहे. त्यामुळे अजित पवार गटाच्या अडचणी वाढू शकतात.सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाने मराठी आणि हिंदी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन घड्याळ हे निवडणूक चिन्ह सर्वोच्च न्यायालयाच्या अधीन राहुन वापरत असल्याचे जाहीर करण्याचे निर्देश न्यायमूर्तींनी दिले आहेत. त्यामुळे अजित पवार गटाला आता तशी जाहिरात द्यावी लागणार आहे. घळ्याळ या चिन्हामुळे होणारा संभ्रम टाळण्यासाठी अजित पवार गटाने हिंदी, इंग्रजी आणि मराठी वृत्तपत्रांमध्ये जाहिरात द्यावी, या पब्लिक नोटीस मध्ये घड्याळाचे चिन्ह हे माझ्याकडे असल्याचे सांगावे, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

# भावांनो, चिमण्यांना वाचवा रे!

**चीनने सन १९५८-६२च्या दरम्यान चार कीटक मोहीम राबवली त्यात त्यांनी पिकांचा नाश करणाऱ्या घटकांना म्हणजेच उंदीर, माश्या, डास आणि चिमण्या हे चार कीटक नष्ट करायचे ठरवले. चीनमध्ये सांस्कृतिक क्रांतीच्या काळात सुरू झालेल्या या चिमण्या मारण्याच्या अभियानमुळे चीनमध्ये चिमण्या जवळजवळ संपुष्टात आल्या, ज्याचा परिणाम गंभीर पर्यावरणीय असंतुलनात झाला, पुढची बरीच वर्षे चीनमधील लोकांना भयंकर उपासमारीला सामोरे जावे लागले. परंतु त्यामुळे पर्यावरणापुढे उभे राहू शकणारे धोके लक्षात आले. त्यानंतर अनेक वर्षांनी जगभरात, तज्ज्ञांच्या अभ्यासाअंती 'चिमणी जगायला हवी' याची जाणीव निर्माण झाली. जगभरात २६ जातीच्या चिमण्यांची नोंद आहे. मात्र या २६ पैकी फक्त २३ चिमण्यांची छायाचित्र सध्या उपलब्ध आहेत. श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा समस्त मानवजातीला सावध करणारा महत्त्वपूर्ण संकलित लेख... संपादक.**



जागतिक चिमणी दिन- वर्ल्ड स्पॅरो डे हा २० मार्च रोजी पाळला जातो. पहिला जागतिक चिमणी दिवस हा दि.२० मार्च २०१० रोजी साजरा करण्यात आला. आज चिमण्यांची संख्या कमी होत चालली आहे. खरं म्हणजे भारतात सगळीकडे सर्वात जास्त संख्येने सापडणारा, विणीचा हंगाम वर्षभर असू शकणारा, माणसाच्या जवळपास राहणारा आणि त्यामुळे नेहमी दिसणारा पक्षी अशी चिमणीची ओळख आहे. परंतु दिवसेंदिवस होत चालल्या बदलामुळे आता चिमण्यांच्या वास्तव्याला धोखा निर्माण झाला आहे. यासाठी जागरूकता निर्माण करण्यासाठी २० मार्च हा दिवस जागतिक चिमणी दिवस म्हणून साजरा केला जातोय. भारतात पाच प्रजातींच्या चिमण्या आढळून येतात. त्यामध्ये, स्थलांतर करणाऱ्या प्रजातींचादेखील समावेश आहे. याशिवाय, जगातही २४ प्रकारच्या चिमण्या आढळून येतात. यापैकी बहुतांश प्रजातींची कोणतीही आकडेवारी उपलब्ध नाही. २०२०मध्ये गुजरातच्या गांधीनगर येथे झालेल्या १३व्या संयुक्त राष्ट्र प्रवासी पक्षी प्रजाती संवर्धन परिषदेत भारतातील पक्ष्यांची सध्याची स्थितीवरील 'स्टेट ऑफ इंडियाज बर्ड' अहवाल प्रकाशित करण्यात आला. देशभरातील दोन सरकारी आणि सहा स्वयंसेवी संस्था आणि अनेक पक्षी निरीक्षकांनी 'सिटिझन सायन्स' या संकल्पनेचा वापर करून हा अहवाल तयार केला आहे. पंधरा हजार पाचशे पक्षी निरीक्षकांच्या सुमारे एक कोटी निरीक्षणांच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात आला. प्रकाशित अहवालात पक्षांच्या ८६७ प्रजातींचा समावेश करण्यात आला होता. या अहवालामध्ये असे म्हटले आहे की गेल्या २५ वर्षात आतापर्यंतची पक्षांच्या संख्येत सर्वात मोठी घट नोंदविली गेली आले. गेल्या पाच वर्षात पक्ष्यांच्या संख्येत तब्बल ७९% घट झाल्याचेही या अहवालात म्हटले आहे. त्यातही कीटकभक्ष्यी असलेल्या चिमणीसारख्या पक्षांची संख्या कमी होणे, हे मानवासाठी धोकादायक असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. ८६७ पैकी १२६ प्रजाती अशा आहेत ज्यांचे प्रमाण स्थिर स्वरूपात असल्याचे आढळून आले आहे आणि काही ठिकाणी वाढलेलीही दिसते. मात्र, १०१ पक्ष्यांच्या प्रजातींच्या संवर्धनासाठी ताबडतोब प्रयत्न करण्याची गरज आहे, ज्यामध्ये चिमणी या पक्षाचा समावेश आहे. चिमण्यांची संख्या शहरी भागातून मोठ्या प्रमाणात कमी झाली असून ग्रामीण भागातही चिमण्यांचे प्रमाण कमी होत चालल्याचे या अहवालात म्हटले आहे.

गेल्या २५ वर्षांत सर्वाधिक घट झालेल्या पक्ष्यांच्या प्रजाती- १) पांढऱ्या पुठ्ठ्याचे गिधाड (व्हाईट रम्पड् व्हल्चर), २) रिचर्डची चिमणी (रिचर्ड्स पिपिट), ३) भारतीय गिधाड (इंडियन व्हल्चर), ४) सोन चिखल्या (पॅसिफिक गोल्डन प्लोवर), ५) बाकचोच तुतारी (कल्र्यू सॅण्डपायपर). चिमण्यांची घटती संख्या हा प्रश्न सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारा घटक आहे. चिमण्यांची संख्या झपाट्याने



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.**

कमी होत असल्यामुळे याचे अनेक गंभीर परिणाम हे विविध परिसंस्थांवर दिसून येत आहेत. चिमण्यांची संख्या कमी झाल्याने त्याचा थेट परिणाम हा शेतातील पिकांवर झाला आहे. पिकांवर पडणाऱ्या रोगराईचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. पिकांवर पडणाऱ्या अळ्या आणि किडे चिमण्या खात असत. मात्र आता चिमण्यांची संख्या कमी झाल्याने पिकांवर पडणाऱ्या अळ्या, किड्यांचा उपद्रव अधिक वाढला आहे, परिणामी पिकांचा उतारा देखील कमी होत आहे. यावर उपाय म्हणून पिकांवर आरोग्यासाठी हानीकारक असलेल्या किटक नाशकांचा वापर केला जात आहे.चिमण्या कमी होण्याची कारणे- १. उद्योगीकरणामुळे वातावरणात झालेला बदल आणि वाढते प्रदूषण. २. शहरीकरण व लोकांचे बदलते राहणीमान, फ्लॅट संस्कृतीतील सिमेंटची घरे यामुळे चिमण्या आपली घरे बनवू शकत नाहीयेत. आधीच्या काळात कौलारू घरं व त्यासमोर असणाऱ्या विहीर यामुळे चिमण्यांना आपले घर बनविणे अतिशय सोपे होते. बदलत्या बांधकामाच्या पद्धतीमूळे पक्षांच्या निवासावर देखील परिणाम होत आहे. ३. कमी होत चाललेली जंगले आणि शहरात निर्माण झालेली मोबाईल टॉवर्स व तारांची जंगले. ४. शेतात होणाऱ्या हानीकारक रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वारेमाप वापर, असले धान्य खाऊन चिमण्या मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. ५. विणीच्या हंगामात (प्रजननकाळात) चिमण्यांना मानवी आणि तंत्रज्ञानातील बाबींचा होणारा त्रास. ६. वाहनं आणि गर्दीचा गोंगाट यामुळेही देखील चिमण्यांना त्रास सहन करावा लागत आहे. ७. पाणथळीच्या जागा नष्ट झाल्याने पूर्वीचे अनेक पक्षी आता दिसत नाहीत. ८. जंगल तोडीमुळे चिमण्यांची घरटे नष्ट होतात. चिमण्यांच्या संवर्धनाचे उपाय- १.पक्षांच्या पाण्याच्या सोयीसाठी पाणथळीच्या जागांची निर्मिती करणे व त्यासोबतच धान्य सुद्धा उपलब्ध करून देणे. उरलेले अन्न पक्षांना टाकणे. आपल्या घराजवळ, बाहेर चिऊताईसाठी दाणा-पाणी ठेवणे अशा गोष्टी प्रत्येक जण करू शकतो. २. पक्षांच्या वावरासाठी नैसर्गिक परिवास निर्माण करणे. ३. शेतीसाठी नीकारक रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर कमी करणे. ४. जागतिक चिमणी दिन या दिवशी लोकांमध्ये चिमणी वाचविण्यासाठीची जागृती करणे, तिचे अन्नसाखळीतील- पर्यायाने पर्यावरणातील महत्त्व समजावणे, चिमणीला जगण्यासाठी योग्य अशी परिस्थिती निर्माण करणे. ५. चिमणीला बाभळीसारख्या नैसर्गिक अधिवासाबरोबरच घरटे बांधण्यास अनुकूल गोष्टी उपलब्ध करून देणे, घराभोवती शक्य असल्यास छोटी झाडेझुडुपे लावणे.

चीनने सन १९५८-६२च्या दरम्यान चार कीटक मोहीम राबवली त्यात त्यांनी पिकांचा नाश करणाऱ्या घटकांना म्हणजेच उंदीर, माश्या, डास आणि चिमण्या हे चार कीटक नष्ट करायचे ठरवले. चीनमध्ये सांस्कृतिक क्रांतीच्या काळात सुरू झालेल्या या चिमण्या मारण्याच्या अभियानमुळे चीनमध्ये चिमण्या जवळ जवळ संपुष्टात आल्या, ज्याचा परिणाम गंभीर पर्यावरणीय असंतुलनात झाला, पुढची बरीच वर्षे चीनमधील लोकांना भयंकर उपासमारीला सामोरे जावे लागले. परंतु त्यामुळे पर्यावरणापुढे उभे राहू शकणारे धोके लक्षात आले. त्यानंतर अनेक वर्षांनी जगभरात, तज्ज्ञांच्या अभ्यासाअंती चिमणी जगायला हवी याची जाणीव निर्माण झाली. जगभरात २६ जातीच्या चिमण्यांची नोंद आहे. मात्र या २६ पैकी फक्त २३ चिमण्यांची छायाचित्र सध्या उपलब्ध आहेत.महंमद दिलावर यांनी सन २००६मध्ये नाशिक येथे नेचर फॉरएव्हर सोसायटी नावाची एक संस्था स्थापन केली. त्यानंतर फ्रान्समधील इकोसिस ॲक्शन फाऊंडेशन आणि जगभरातील असंख्य राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहाय्याने या संस्थेने सन २०१०पासून जागतिक चिमणी दिन साजरा करण्यास सुरुवात केली. जे लोक चिमण्यांच्या संवर्धनासाठी काम करतात, अशा लोकांचा संस्थेच्या वतीने जागतिक चिमणी दिनाच्या निमित्ताने सत्कार देखील करण्यात येतो. या संस्थांमार्फत चिमण्या कमी होण्याची कारणे शोधण्यासाठी अभ्यास व त्यांच्या संवर्धनासाठी उपाय आणि वातावरणातील वाढत्या प्रदूषणाचा चिमण्यांवर होणारा परिणाम यासाठी जगभर चळवळ उभारली जात आहे, हे योग्यच आहे!

!! जागतिक चिमणी दिनी सर्वांना सावध होण्यास हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# राष्ट्रशिल्पकार या नावातच शिक्षकाचा गौरव-साळुंखे

## सांगोला रोटरी क्लब व इनर व्हील क्लबच्या पुरस्काराचे वितरण

**सांगोला । प्रतिनिधी**

चांगल्या कामाची पावती म्हणून शिक्षकांना आदर्श शिक्षक किंवा गुणवंत शिक्षक नावाने संबोधले जाते.मात्र सांगोला रोटरी क्लब व इनरव्हिल क्लबने शिक्षकांना वेगळी उपाधी लावून राष्ट्रशिल्पकार पुरस्काराने गौरविले आहे, ही अतिशय आगळी - वेगळी गोष्ट असून या दोन्ही क्लबचे अभिनंदन करावे,तेवढे थोडेच आहे. असे गौरव उद्गार माजी शिक्षक आमदार भगवानराव साळुंखे यांनी काढले.सांगोला रोटरी क्लब, व इंनरव्हील क्लबने आयोजित केलेल्या राष्ट्रशिल्पकार पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व लायन्स क्लब ३२३ ड- १ चे माजी प्रांतपाल प्रा. प्रबुद्धचंद्र झपके होते. व्यासपिठावर दोन्ही क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते.

सांगोला शहरातील सदानंद मल्टिपर्पज हॉल मध्ये झालेल्या या दिमाखदार सोहळ्यात



रोटरी क्लब सांगोला व इनरव्हील क्लब सांगोला यांनी निवडलेल्या प्रत्येकी पाच शिक्षकांना राष्ट्रिशल्पकार पुरस्कार देवून गौरविण्यात आले. या मध्ये रोटरी क्लबच्या वतीने बेबीनंदा मच्छिंद्र गेजगे, सुनील मधुकर लिगाडे,आनंद श्रीरंग खंडागळे, संजय बाबुराव शिंत्रे व मच्छिंद्र जगन्नाथ जगताप या शिक्षकांना सन्मानित करण्यात आले. इनरव्हील क्लब सांगोला यांच्या वतीने

उत्तम रावसाहेब सुरवसे, बाळू तुकाराम अनुसे, सुरेखा दत्तात्रय शिंदे, प्रशांत शिवाजीराव गायकवाड व सीताराम मारुती बुरांडे या पाच शिक्षकांना राष्ट्रशिल्पकार पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला.त्याच प्रमाणे रोटरी क्लब मधील सर्व शिक्षक सदस्य व इनरव्हील मधील सर्व शिक्षि कांचा सन्मान करण्यात आला.शासनाने किंवा संस्थेने दिलेल्या पुरस्कारापेक्षा रोटरी क्लब ,किंवा इनरव्हील क्लब या सेवाभावी संस्थांनी दिलेल्या अशा पुरस्काराचे मूल्य फार मोठे असते, शिवाय नुसते प्रस्ताव मागवून व मुलाखत घेऊन निवड करण्या पेक्षा रोटरी पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शाळेत जावून व गावपातळीवरील नागरिकांशी संवाद साधला आणि शिक्षकांची निवड केली,ही गोष्ट वाखाणन्यासारखी असून कौतुकास्पद आहे असे मत प्रा. झपके यांनी अध्यक्षीय मनोगतात व्यक्त केले.प्रारंभी कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून करण्यात आली.सिंहगड कॉलेजचे प्राचार्य व सांगोला रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा. साजिकराव पाटील यांनी प्रमुख पाहुणे भगवानराव साळुंखे यांचा परिचय करून दिला.सांगोला रोटरी क्लबचे सचिव ड.सचिन पाटकुलकर यांनी प्रास्ताविक केले. इंजी.संतोष भोसले व प्रा सौ.पाटील यांनी सूत्रसंचलन तर आभाप्रदर्शन इनरव्हील अध्यक्ष सविता लाटणे यांनी केले.कार्यक्रमातील सन्मानचिन्हाचे प्रायोजक प्रवीण मोहिते व गीता मोहिते यांचा विवाह वर्धापन दिनानिमित्त विशेष सत्कार करण्यात आला.अतिशय नेटक्या व दिमाखदार अशा सोहळ्यास रोटरी सदस्य, इनरव्हील सदस्य,नागरिक,पत्रकार,नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आठवलेंना उमेदवारी द्या अन्यथा विरोधात प्रचार-अजय साळवे


**अहमदनगर । प्रतिनिधी**

शिर्डी लोकसभा मतदारसंघातून रिपब्लिकन पक्षाचे नेते केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांना उमेदवारी मिळावी म्हणून गेल्या वर्षभरापासून आरपीआयच्या वतीने मागणी केलेली आहे. निवडणुकीच्या काळातच आरपीआय पक्षाची आठवण येते अन्यथा कोणत्याही कार्यक्रमांमध्ये आठवले यांचा विसर पडत असून पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना देखील विश्वासात घेतले जात नाही त्यामुळे भाजपने आठवले यांनाच उमेदवारी द्यावी अन्यथा आम्ही आरपीआयचे कार्यकर्ते भाजपाचा प्रचार करणार नाही उलट रिपब्लिकन पक्षाचा अपक्ष उमेदवार देऊ व लवकरच अहमदनगर दक्षिण मतदार संघात मेळावा घेऊन भूमिका स्पष्ट करणार असल्याचा इशारा उत्तर महाराष्ट्र सचिव अजय साळवे यांनी दिला. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची बैठक झाल्यानंतर त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आरपीआयचे उत्तर महाराष्ट्र सचिव अजय साळवे समवेत दक्षिण जिल्हाध्यक्ष सजंय भैलुमे, उत्तर महा. शशीकातदादा पाटील, युवक अध्यक्ष अमित काळे, विलास साठेसर, सदाशिव भिंगारदिवे, विनोद भिंगारदिवे, चंद्रकांत भिंगारदिवे, चंद्रकांत ठोबें, नाना पाटोळे, श्रीगोंदा तालुकाध्यक्ष राजु जगताप, पारनेर तालुकाध्यक्ष राजेंद्र इबाळे, पाथर्डी तालुकाध्यक्ष बाबा राजगुरू, जेष्ठ नेते गौतम घोडके, दया गजभिजे आदिसह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी उत्तर महाराष्ट्र सचिव अजय साळवे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत आरपीआय पक्षाला सोलापूर व शिर्डी या दोन जागा मिळावी म्हणून भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांकडे मागणी केली होती. त्यापैकी शिर्डीची जागा आरपीआयचे नेते रामदास आठवले यांच्यासाठी मागितली होती आठवले यांना मागील सारखे राज्यसभा व मंत्रीपद देऊन शांत करणार असाल तर ते आम्ही खपून घेणार नाही आम्ही भाजपा बरोबर २००९ साला पासून काम करत आहोत. २०१४ मध्ये त्यांचा आम्ही प्रचार केला आमचे केंद्रात राज्यात भलेही आमदार खासदार नसतील मात्र आमच्या पक्षाच्या जोरावरच त्यांना सत्ता स्थापन करता आली. त्यामुळे भाजपने त्यांना राज्यसभेवर घेऊन मंत्रीपद दिले यावेळी भाजपने आम्ही मागणी केलेली आहेकी सोलापूर व शिर्डी मतदारसंघातून रामदास आठवले यांना सन्मानपूर्वक उमेदवारी जाहीर करावी अन्यथा जर सन्मानपूर्वक शिर्डीची जागा मिळाली नाही तर भाजपा विरुद्ध प्रचार करून सोलापूर व शिर्डी मतदार संघातून अपक्ष उमेदवार देऊ असा इशारा बैठकीतून देण्यात आला व लवकरच अहमदनगर दक्षिण मतदार संघात समाज बांधवांचा मेळावा घेऊन भूमिका जाहीर करणार असल्याचे सांगितले

# आई चिमणीचे नाव घेऊन घास भरवायची;आज चिमण्यांना वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे

जागतिक चिमणी दिवस साजरा करतांना चिमण्यांना व संपूर्ण पशुपक्ष्यांना कशा पध्दतीने वाचविता येईल यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत. चिमण्यांना रहाण्याकरीता घरटे नाहीत याकरिता वृक्षारोपण व्हायला हवे, उन्हाळ्यात चिमण्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. त्यामुळे आतापासूनच जीथे-जीथे चिमण्या येवू शकतात तीथे-तीथे किंवा आपल्या घराच्या भिंतीवर किंवा घरावर एखाद्या तबकड्यात पाणी अवश्य ठेवावे सोबतच खाण्याकरिता थोडे तांदळाचे दाणे किंवा खाद्य टाकावे.कारण चिमण्यांना खरोखरच आपली नितांत गरज आहे.अन्यथा ज्या चिमण्या दिसतात त्या सुध्दा लुप्त होवू शकतात याला नाकारता येत नाही.कारण दिवसेंदिवस चिमण्यांचे प्रमाण कमी-कमी होतांना दिसत आहे. चिमण्यांच आपल्या मानव जातीवर खुप मोठे उपकार आहेत ते तर आपण फेडु शकत नाही.परंतु आज बदलत्या काळानुसार त्यांच्यावर मोठे संकट ओढावले आहे.त्यातुन मुक्त करण्यासाठी थोडा हातभार आपण लावु शकतो याकरिता पाण्याची सोय व खाद्यान्नाची सोय सर्वांनीच आपापल्या परीने केली पाहिजे.चिमण्यांच्या अनुषंगाने अनेक पक्षी पाण्याचा व खाद्यान्नाचा स्वाद अवश्य घेतील आणि आयुष्य वाढेल व चिमण्यांचा किलबिलाट सर्वत्र दिसून येईल.जगातील चिमण्यांची घटती संख्या लक्षात घेता जगातील देशांनी चिमण्यांना वाचविण्याच्या दृष्टीकोनातून जागतिक चिमणी दिवस साजरा करण्याचे जाहीर केले.याकरीता २० मार्च ही तारीख ठरविण्यात आली आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहाय्याने पहिला जागतिक चिमणी दिवस २० मार्च २०१० ला साजरा करण्यात आला.भारतात सगळीकडे सर्वात जास्त संख्येने सापडणारा,मानसाच्या जवळपास वावरणारा व नेहमी डोळ्यांनी दिसणारा पक्षी म्हणून चिमणीची भारतभर चांगलीच ओळख आहे.आज जगातील बदलत्या तापमानामुळे व हवामानामुळे, परमाणू परिक्षण, वाढते औद्योगिकीकरण, मोबाईलचे टॉवर,वाढते शहरीकरण, जंगलतोड, शेतातील रासायनिक खतांचा वापर व किटकनाशके,वणवे लागणे,ध्वनी प्रदुषण, पाणथळ्यांच्या जागा नष्ट झाल्याने आणि जगातील यूध्दजन्य परिस्थिती यामुळे चिमण्यांसह अन्य पशु-पक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले असुन धोकादायक स्थितीत आहे.यामुळे अनेक पशु-पक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. आज जंगल तोडीमुळे जंगलातील पशु-पक्षी शहराकडे धाव घेतांना दिसते.हा संपूर्ण प्रकार निसर्गाचा होत असलेल्या ह्रासामुळे दिसून येतो व



मानवजातीच्या अतीक्रमनामुळे निर्माण झाला आहे.पुर्वी कवेलुचे घर असायचे, मातीच्या भिंती असायच्या त्यामुळे चिमण्या आपले घरटे कुठे तरी अवश्य बनवायचे. कारण कवलाचे घर व मातींच्या भिंती नेहमी थंड असतात याचा सहारा घेऊन रहायचे.त्यामुळे प्रत्येक घरामध्ये आपल्याला चिमण्यांचे घरटे अवश्य दिसायचे व चिमण्यांचा मधुर किलबिलाट ऐकू यायचा.यावरून सकाळचा काय वेळ झाला आणि संध्याकाळचा काय वेळ झाला हे त्यांच्या किलबिलाट वरून ताबडतोब सर्वांनाच लक्षात यायचे.परंतु आज चिमण्यांचा किलबिलाट नामशेष झाल्याचे दिसून येते. आज चिमण्यांना घरटे बांधण्यासाठी योग्य जागा मिळत नाही, पाण्यासाठी वणवण हिंडावे लागते अशी भयावह परिस्थिती आज चिमण्यांची झाली आहे.आज घरांचे सिमेंटीकरण झाल्याने चिमण्यांना घरटे बांधण्यास मोठा संघर्ष करावा लागतो आहे.वाढत्या प्रदुषणांमुळे व उष्णतामानामुळे चिमण्यां व इतर पशु-पक्षांना हवेत मोकळा स्वास सुध्दा मिळु शकत नाही.अशी कठीण परिस्थिती पशु-पक्षांवर असलेली आहे. आपण चीनचा विचार केला तर १९५८-६२ या कालावधीत चार किटक मोहिम राबविण्यात आली त्यात पिकांचा नाश करणाऱ्या घटकांना म्हणजे उंदीर,माश्या,डास आणि चिमण्या हे चार नष्ट करायचे सरकारने ठरविले.यामुळे चीनमध्ये चिमण्या जवळपास संपुष्टात आल्याचे दिसून येते.त्यामुळे याचा गंभीर परिणाम चीनच्या पर्यावरणावर झाला आहे. यानंतर पक्षी तज्ज्ञांनी अभ्यासाच्या अंती सांगितले की चिमणी पर्यावरणाच्या दृष्टीने जगाला आवश्यक आहे.जगभरात २६ जातिंच्या चिमण्यांची नोंद आहे.परंतु यातील अनेक चिमण्यांच्या जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जगातील पक्षांचा विचार केला तर ८६७ प्रजाती आहेत.परंतु गेल्या पंचवीस वर्षांत आतापर्यंत पक्षांच्या संख्येने सर्वात मोठी घट झाली आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. त्याचप्रमाणे कीटकभक्ष्यी चिमण्यांची संख्या कमी होने अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.कारण चिमण्यांची घटती संख्यांचा प्रश्न सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारा आहे.कारण पिकांवर पडणाऱ्या अळ्या आणि किटक चिमण्या खायच्या परंतु चिमण्यांच्या घटत्या संख्येमुळे पिकांवर सुध्दा दुष्परिणाम होतांना दिसतो. एकेकाळी चिमणी हा आपला अत्यंत महत्त्वाचा पक्षी होता कारण लहान मुले जेवणाकरीता कंटाळा करायचे तेव्हा आपली आई किंवा आजी चिमणीची आठवण अवश्य करायची व लहान मुले पोटभर जेवण सुध्दा करायची.चिव चिव ये चारा खा पाणी पी आणि भुर्र उडून जा असे म्हणत आपला घास भरत यामुळे आपलं बालपण समृद्ध झाले.कारण आई व आजी इतर पक्षांची ओळख करून देतांना चिऊताईचा लाड जास्तच करायची. चिमण्यांनी आपल्याला बरेच काही दिले त्यामुळे आज त्यांना आपल्या कडून फक्त पाण्याची अपेक्षा आहे ती आपण अवश्य पुर्ण करूया.जागतिक चिमणी दिवसाचे औचित्य साधून भारतासह जगातील संपूर्ण देशांनी आजच्या दिवशी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचा संकल्प करावा व वृक्षारोपण करावे.यामुळे गुरांना चारा,पशु-पक्षांना रहाण्यासाठी घरट्यांसाठी जागा उपलब्ध होईल, मानवाला शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे पर्यावरण सुधारण्यास मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित राहील आणि जिकडे-तिकडे हिरवागार गालिचा पसरलेला दिसुन येईल. आपण सर्वांनीच चिमण्या वाचविण्याचा संकल्प करूया.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे चिंचवड येथील राज्यस्तरीय अधिवेशन उत्साहात संपन्न

## बर लिहिण्यापेक्षा खरं लिहिणे जास्त अपेक्षित-प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने शनिवारी (दि.१६) चिंचवड (पुणे) येथे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन संपन्न झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे,प्रदेश सरचिटणीस डॉ.विश्वास आरोटे,उपाध्यक्ष नितीन शिंदे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष पराग कुंकुलोळ, ज्येष्ठ लेखक अरविंद जगताप तसेच ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले, महेश म्हात्रे, मंदार फणसे, आशिष जाधव यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाले .या प्रसंगी असंघटित कामगारांचे नेते समाजसेवक बाबा आढाव , भोसरी मतदार संघाचे आ.महेश लांडगे, शिरूर मतदारसंघाचे मा. खासदार डॉ.अमोल कोल्हे , आ.उमा खापरे,राजकीय विश्लेषक उदय निरगुडकर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर,नगरसेवक मोरेश्वर भोंडवे,चेतन भुजबळ वैभव स्वामी आदी मान्यवर उपस्थित होते. प्रस्ताविक करताना नितीन शिंदे यांनी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने आम्ही वर्षभर विविध कार्यक्रम राबवत असतो. तसेच महाराष्ट्रातीलही विविध पत्रकारांचे संघटन करून त्यांचे प्रश्न जाणून त्यांना न्याय देण्याचे व अडचणी सोडवण्याचे काम करत असतो. राज्यभरातील पत्रकारांना संघटित करून विविध प्रश्नांवर चर्चा होणे महत्वाचे आहे. पत्रकारांची एकजूट निर्माण करणे यासाठी संघटना कार्यरत असते. तसेच या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित असल्याचे त्यांनी सांगितले आहे. डॉ. उदय निरगुडकर म्हणाले पत्रकारितेच्या क्षेत्रात -ख चा शिरकाव पत्रकारांच्या बेरोजगारीत वाढ करणारा भासत आहे. आज देशाच्या कानाकोपऱ्यात विविध प्रकारचे चैनल, यूट्यूब चैनल, डिजिटल माध्यम उदयास येत आहेत विविध माध्यमे आपापल्या पद्धतीने उत्तम रित्या सामाजिक प्रश्नांची मांडणी करत आहेत. हे करत असताना काही महत्वाच्या गोष्टीचे भान ठेवणे महत्वाचे आहे. पत्रकारांनी




निष्पक्षपातीपणा, विश्वासार्हता टिकविणे अत्यावश्यक आहे.

बातमी की जाहिरात या द्विधा संकटातूनही पत्रकाराला जावे लागते. परिसंवाद सत्रामध्ये ज्येष्ठ लेखक अरविंद जगताप, ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले, महेश म्हात्रे, मंदार फणसे, आशिष जाधव सहभागी झाले त्यांनी अमृतकाळातील माध्यम स्वातंत्र्य, भविष्य आणि पत्रकारितेतील राम यावर चर्चा करताना माध्यमांना आज सर्दी झाली आहे का? आजचा निर्भिड पत्रकार कोण? पत्रकारांवर कोणकोणत्या प्रकारचे दबाव असतात? पत्रकारितेत युट्यूब महत्त्वाचा रोल निभावत आहे का? शेतकरी, कामगार, सामान्य नागरिक यांचे प्रश्न माध्यम निष्पक्ष मांडतात का? यावर मान्यवरांनी आपली निर्भिड मते मांडली. दुसऱ्या सूत्रामध्ये बोलताना प्रदेश सरचिटणीस डॉ.विश्वास आरोटे म्हणाले की सर्व जिल्ह्यातील पत्रकारांवरचे संघटन जाळ निर्माण करून पत्रकार मजबुती देणे हा या अधिवेशनात्मक उद्देश आहे

प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले की पत्रकार कोणाचाच नसतो तो बातमीचा असतो. बर लिहिण्यापेक्षा खरं लिहिणे जास्त अपेक्षित आहे. पत्रकारांचे आर्थिक धोरण यावरही मंथन होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्यभरात पंचविस हजाराहुन अधिक पत्रकार सदस्य आहेत.त्यांच्या विविध प्रश्नासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ कार्यरत आहे. बाबा आढाव म्हणाले पत्रकारांच्या जीवनामध्ये नेहमीच संघर्ष व लेखणीतून लढाया असतात. राज्यातील सर्व पत्रकार एका ठिकाणी पाहण्याचा हा पहिलाच योग असावा पत्रकार हा समाजातील विविध प्रकारच्या समस्यांची नाडी जाणणारा डॉक्टरच असतो. त्यामुळे त्याने निर्भयपणे उत्तम लिखाण मांडावे. जेणेकरून सामाजिक हित जपण्यासाठी मदत होईल.शरद पवार यांनी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या अधिवेशनास शुभेच्छा देत सांगितले की पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो आज पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये अनेक आव्हाने आहेत. लोकशाहीला मजबूत ठेवण्यासाठी निर्भीड पत्रकारिता आवश्यक आहेआमदार बच्चू कडू म्हणाले की एक सामान्य घरातील कार्यकर्ता ते आमदार होणं हे पत्रकारांमुळे शक्य झाले मात्र आज जाहिरात व पत्रकारिता याची रसमिसळ होत आहे. त्यामुळे चांगल्या पत्रकारांना त्रास सहन करावा लागतो. यासाठी हातातील लेखणी मजबूत असावी असा सल्ला त्यांनी दिला.खासदार डॉ. अमोल कोल्हे म्हणाले की पत्रकारांमुळे समाजातील विविध घटकांसाठी लढणाऱ्या ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांची भेट अधिवेशनाच्या निमित्ताने झाली. सर्वसामान्यांची बातमी म्हणजे वर्तमानपत्र ही वर्तमानपत्राची ओळख असायला हवी. उजव्या हाताने केलेले दान डाव्या हाताला कळू नये असं म्हटलं जातं ते मतदानाच्या बाबतीतही होतं मात्र आता मतदान करताना भविष्याचा ही विचार करायला हवा. हा खरच अमृत काळ आहे का? याचे आत्मपरीक्षण करायला हवे. यावेळी विवेकवादी पत्रकारिता हिना कौसरखान,आश्वासन पत्रकारिता पुरस्कार रवींद्र आंबेकर,उत्कृष्ट पत्रकारिता दिनेश केळूसकर, युध्दवार्ता पत्रकारिता विनोद राऊत, आरोग्य पत्रकारिता संतोष आंधळे,प्रणादायी पत्रकारिता सतीश नवले, अभिव्यक्ती पत्रकारिता सचिन चपळगावकर, कृषि पत्रकारिता विनोद इंगोले, जिजाऊ पत्रकारिता सुमित्रा वसावे, सद्रक्षणाय पत्रकारिता वैभव सोनवणे, आदर्श पत्रकारिता प्रविण बिडवे, एकलव्य पत्रकारिता प्रकाश बेळगोजी, शोध पत्रकारिता रोहित आठवले, उत्कृष्ट पत्रकारिता सागर आव्हाड, निर्भिड पत्रकारिता अमोल काकडे तसेच वाशिम रत्न पत्रकारिता निलेश सोमाणी,उत्कृष्ठ पत्रकारिता अमोल यलमार, उत्कृष्ट संघटक दशरथ चव्हाण (नवी मुंबई), नयन मोंढे (अमरावती), नितीन शिंदे (ठाणे), महेश पानसे (नागपूर), रमजान मन्सुरी (गुजरात), शिवाजी नेहे (गोवा), राजश्री चौधरी (दिल्ली), किशोर रायसाकडा (जळगाव), रोहिदास गाडगे (पुणे ग्रामीण), भूषण महाजन (जळगाव), शैलेश पालकर (रायगड), राजेंद्र कोरके (पंढरपूर), स्वामी शिरकूल (मुंबई), आरोग्य पत्रकारिता बाबा देशमाने, उपक्रमशील पत्रकारीता प्रभु गोरे (औरंगाबाद), वैभव स्वामी (बीड), आनंद शर्मा (नागपूर), प्रविण सपकाळे (जळगाव), प्रताप मेटकरी (सांगली),, प्रदीप शेंडे (नागपूर), आबा खवणेकर (सिंधुदूर्ग), पोपट गवांदे (नाशिक) यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला . उपस्थित सर्व पत्रकारांना संघाकडून पत्रकारिते साठी उपयोगी डायरी , बॅग भेट देण्यात आली. या अधिवेशनास राज्यातील शहरी व ग्रामीण पत्रकार मोठ्या संख्येत उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ.विश्वासराव आरोटे, नितीन शिंदे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, प्रदेश प्रसिध्दी प्रमुख नवनाथ जाधव, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष पराग कुंकुलोळ, उपाध्यक्ष अतुल क्षीरसागर, महादेव मासाळ, सचिव जमीर सय्यद, कार्याध्यक्ष औदुंबर पाडूळे, खजिनदार मिलींद संधान तसेच ॲढ.संजय माने, योगेश गाडगे, विजय जगदाळे, विकास शिंदे, बेलाजी पात्रे, प्रमोद सस्ते, भाऊसाहेब वाकचौरे, प्रसाद वडघुले, सागर झगडे,शशिकांत जाधव, प्रकाश लोखंडे, सुनील बेणके, संजय भेंडे, संदीप सोनार आदींनी केले.सूत्रसंचालन अश्विनी सातव व अतुल क्षीरसागर यांनी केले.मिलिंद संधान, सागर झगडे यांनी आभार मानले.

## माझ्या उमेदवारीने काय फरक पडेल हे पुणेकरच दाखवतील-वसंत मोरे

**पुणे**-माझ्या उमेदवारीने काय फरक पडेल हे पुणेकर भाजपला दाखवतील असे विधान वसंत मोरे यांनी केले आहे. दिवशी वसंत मोरे रिंगणात उतरेल, त्या दिवशी पुणे लोकसभेच्या निवडणुकीत खऱ्या अर्थाने रंगत येईल असेही ते म्हणाले. वसंत मोरे हे पुण्यातून लोकसभा निवडणूक लढण्यावर ठाम आहेत.आज प्रसार माध्यमांशी बोलतांना ते म्हणाले, ''आजपासून निवडणुकीला ५५ दिवस आहेत. त्यामुळे कमी दिवस वगैरे काही नाही. ज्या दिवशी वसंत मोरे रिंगणात उतरेल, त्या दिवशी पुणे लोकसभेच्या निवडणुकीत खऱ्या अर्थाने रंगत येईल. तेव्हा आपण निवडणूक कशी एकतर्फी होईल हे पाहू. माझी वेळ नक्कीच चुकलेली नाही. मी वेळ घेतोय. योग्य वेळी मी योग्य निर्णय घेईन'', असे मोरेंनी स्पष्ट केले.तसेच, महाविकास आघाडीकडून उमेदवारी मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहे. इथे फक्त निवडणुका लढायच्या नाहीत, तर जिंकायच्याही आहेत. त्यामुळे जिंकण्यासाठी लढायचे असेल तर योग्य ट्रॅकवर असणे गरजेचे आहे. मी योग्य ट्रॅकवरच असून त्यात यशस्वी होईन असे मला वाटते. पुढील राजकीय वाटचालीसंदर्भात आम्ही लोकांकडून मत जाणून घेत आहोत. लोक बऱ्याचदा काही पर्याय सुचवतात. पण ते निवडताना पुण्याचे हित झाले पाहिजे त्या दृष्टीने पावले टाकतो'', असे मोरे म्हणाले.याशिवाय महाविकास आघाडीकडून उमेदवारी मिळाली नाही तर अपक्ष लढणार का प्रश्नावर मोरे म्हणाले की, ''मला उमेदवारी मिळावी यासाठी सर्वांच्या गाठीभेटी घेतल्या आहेत. त्यामुळे मला निश्चित उमेदवारी मिळेल, माझ्या समोर मुरलीधर मोहोळ उमेदवार असले तरी मी एक नंबरची मतं घेऊन विजयी होईल. ज्या ज्या वेळी माझ्या आयुष्यात संघर्षाला सामोरे जावं लागलं आहे त्यावेळी मोठा विजय प्राप्त केला आहे. ही निवडणुक माझ्या आयुष्याला वेगळी कलाटणी देणार आहे. त्यामुळे मी यातून नक्कीच मार्ग काढेल आणि विजयी होईल'', असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.

## उजनी धरणात अवघे ३० TMC पाणी! सोलापूरच्या औज बंधाऱ्याने गाठला तळ

**सोलापूर :** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या औज बंधाऱ्याने तळ गाठला असून अवघे दोन-तीन दिवस पुरेल इतकेच पाणी सध्या त्यात शिल्लक आहे. दुसरीकडे उजनीतून भीमा नदीद्वारे सोडलेले पाणी सोमवारी माचणूरच्या पुढे आले होते. बुधवारी (ता. २०) उजनीचे पाणी औज बंधाऱ्यात पोचेल. पण, गढूळ पाण्यामुळे शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होवू शकतो.



सोलापूर शहराला सध्या औज बंधारा व उजनी धरणावरील सोलापूर- उजनी पाईपलाइनमधून पाणीपुरवठा होतो. सध्या शहराला चार दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. केगाव, बाळे, देगाव, अवंती नगर, आदित्य नगर, जुळे सोलापूर, नई जिंदगी, श्री सिद्धेश्वर साखर कारखाना परिसर, किनारा हॉटेल परिसर, गावठाणमधील विकास नगर, सोनी नगर, सात रस्ता परिसर, गुरुनानक चौक परिसर, आंबेडकर नगर, शिक्षक सोसायटी, बापूजी नगर, अशोक चौक, कर्णिक नगर, पद्मनगर, कुचन नगर, अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसर, विडी घरकूल, शेळगी ते दहिटणे परिसर अशा विविध भागाला टप्प्याटप्याने चार दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. उजनी-सोलापूर पाईपलाइन दुरुस्तीमुळे काही भागातील तर औज बंधारा कोरडा पडल्यावर किंवा पाईपलाइन नादुरुस्त झाल्यावर काही भागाचा पाणीपुरवठा विस्कळीत होतो.सध्या उजनी धरण तळ गाठत असल्याने पाणी काहीसे गढूळ येत असल्याचे यापूर्वी पहायला मिळाले. आता नदीतून औज बंधाऱ्यात आलेले पाणी देखील गढूळ असल्यास औज बंधाऱ्यावरून होणारा पाणीपुरवठा देखील गढूळ असू शकतो, असे पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी 'सकाळ'शी बोलताना सांगितले. नागरिकांनी पाणी उकळून प्यावे, असे आवाहन महापालिकेकडून यापूर्वीच करण्यात आले आहे. दरम्यान, उजनीचे पाणी औज बंधाऱ्यात पोचल्यावर पुढील ४५ ते ५० दिवस शहराच्या पाण्याचा प्रश्न दूर होणार आहे. पण, मे महिन्यात पुन्हा एकदा सोलापूरसाठी भीमा नदीतून पाणी सोडावे लागणार असून तीव्र उन्हाळ्यामुळे त्यावेळी अंदाजे सात टीएमसी पाणी लागू शकते.

## अनिलदादा जगताप व सचिन मुळुक यांच्या उपस्थितीत बीड शहरातील अनेक शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

**बीड । प्रतिनिधी**

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते मुख्यमंत्री मा.ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब आदेशानुसार व युवासेना प्रमूख तथा खासदार मा.श्री.श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, मराठवाडा संपर्क नेते माजी मंत्री अर्जुनराव खोतकर, जिल्हा संपर्कप्रमुख डॉ. विजय पाटील,बीड विधानसभा संपर्कप्रमुख बापू मोरे यांच्या सूचनेवरून जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिनभैय्या मुळूक यांच्या आदेशानुसार तसेच शहरप्रमुख नंदकिशोर पिंगळे यांच्या शिफारशीनुसार बीड शहरातील शिवसेना



पदाधिकाऱ्यांच्या काल दि. १८ मार्च रोजी दु १.०० वाजताच्या दरम्यान नियुक्त्या करण्यात आल्या. यामध्ये

नवनाथ सुखदेव शिंदे - शहर संघटक, गणेश दत्तात्रय राऊत- उपशहर प्रमुख, हनुमानप्रसाद गोकुळप्रसाद पांडे - उपशहर प्रमुख, प्रमोद (बंटी) सुग्रीव धनवे - उपशहर प्रमुख, अनिकेत अंकुशराव नाटकर - उपशहर प्रमुख, गणेश दावजीबा भांडवले - उपशहर प्रमुख, आकाश सदाशिवराव वडमारे - विभाग प्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली. यादरम्यान वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची शिकवणीचा सक्रीयपणे प्रचार आणि प्रसार करून शिवसेना पक्ष वाढीसाठी सर्वांना सोबत घेऊन कार्य कराल असा विश्वास शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप व सचिन मुळुक यांनी व्यक्त केला असून नवं नियुक्त पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याबरोबरच शिवसेना नेते शिंदे साहेब यांनी शब्दाचा मान ठेऊन माझ्या अनेक वर्षांच्या विश्वासातील सहकारी मित्रांवर पक्षाची विश्वासाने जिम्मेदारी सोपवली असे म्हणत अनिलदादा जगताप यांनी एकनाथ शिंदे यांचे आभार मानले व नवं नियुक्त शिवसेना पदाधिकाऱ्यांचं स्वागत केले.

## हवामान बदलामुळे यंदा केशर आंबा तीन टप्प्यांमध्ये बाजारात उपलब्ध होणार

**पंढरपूर :** सोलापूर जिल्ह्यात यंदा कमी पडलेला पाऊस तसेच हवामानातील बदलामुळे यावर्षी आंबा बागेमध्ये तीन स्टेजमध्ये मोहर आला होता. त्यामुळे यंदा केशर आंबा तीन टप्प्यांमध्ये म्हणजे एप्रिल, मे व जून महिन्याच्या अखेरीपर्यंत बाजारात उपलब्ध होईल अशी माहिती कोर्टी (ता. पंढरपूर) येथील आंबा बागायतदार सचिन कुलकर्णी यांनी 'सकाळ ' शी बोलताना दिली.

सोलापूर जिल्ह्यामध्ये पूर्वी डाळिंब फळबागेची मोठ्या प्रमाणावर लागवड होत होती. मात्र मागील काही वर्षांमध्ये तेल्या व मर रोगामुळेमुळे डाळिंब बागायतदार शेतकऱ्यांचा कल केशर आंबा, पेरू, केळी, सिताफळ आदी फळबागांची लागवड करण्याकडे वाढला आहे. पंढरपूर तालुक्यांमध्ये केशर आंबा फळबागेचे एकूण क्षेत्र सुमारे ४९० हेक्टर आहे. यावर्षी सोलापूर जिल्ह्यामध्ये पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिले. त्यामुळे आंब्याच्या झाडांना जास्त ताण मिळाल्याने व थंडीच्या हंगामामध्ये सकाळी सरासरी १५ अंश तापमान राहिल्याने यंदा बहुतांश आंब्याच्या झाडांना लवकर मोहर आला.तर नंतर वातावरणात बदल झाल्यामुळे त्याच झाडांना उशिरा मोहर आला. त्यामुळे सध्या केशर आंब्याच्या झाडाला तीन विविध आकाराची फळे पहावयास मिळत आहेत.

# ज्यांना विरोधकांचे काम करायचं आहे त्यांनी लगेच पक्ष सोडा : मंत्री चंद्रकांत पाटील

**बारामती । प्रतिनिधी**

महायुतीच्या समन्वयासाठी उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी बारामतीत महायुतीतील घटक पक्षांसह सर्वांची बैठक घेतली. या बैठकीत नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी सर्वांनी संगनमताने काम करायचे आहे. असे सांगत असतानाच कोणीही निगेटिव्ह बोलायचं नाही अशी तंबीच दिली. त्याचबरोबर ज्यांना विरोधकांचे काम करायचे आहे त्यांनी आत्ताच पक्ष सोडावा असा स्पष्ट इशारा चंद्रकांत पाटील यांनी दिला.

अर्थात त्यांना पुन्हा पक्षात प्रवेश मिळणार नाही, सरकारच्या योजना घ्यायच्या आणि नंतर वेळ येईल त्यावेळी मनासारखे वागायचे.असले खपवून घेतले जाणार नाही असा इशाराही चंद्रकांत पाटील यांनी दिला.यावेळी आमदार राहुल कुल,माजी आमदार रमेश थोरात,भाजपचे किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष वासुदेव काळे,राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर, रूपाली चाकणकर,पृथ्वीराज जाचक, वैशाली नागवडे,जालिंदर कामठे,नवनाथ पडळकर, बाळासाहेब गावडे,पांडुरंग कचरे,दिगंबर दुर्गाडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी चंद्रकांत पाटील यांनी अत्यंत महत्त्वाचे वक्तव्य केले,त्यांनी सांगितले की,प्रत्येक मतदान केंद्रावर आपल्याला एका बुथवर किमान ३७० मतांची गरज आहेही ३७० मते महायुतीला मिळालीच पाहिजेत, यासाठी काम करा.शरद पवारांनी नरेंद्र मोदी यांना शब्द दिला होता,मात्र ऐनवेळी माघार घेत त्यांनी नरेंद्र मोदींचा अपमान केला आहे. त्या अपमानाचा बदला घेण्यासाठी तुम्हाला काम करायचे आहे. त्यामुळेच घड्याळाच्या चिन्हावर बटन दाबून महायुतीच्या उमेदवाराला तुम्हाला विजयी करायचे आहे.असे चंद्रकांत पाटील यांनी बैठकीच्या दरम्यान सांगितले.



# वाघाच्या जिल्ह्याची डरकाळी लोकसभेत फोडणार ना.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला निर्धार

## गांधी चौक चंद्रपूर येथे भव्य स्वागत समारंभ संपन्न

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विश्वगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगातील सर्वात जास्त वाघ असणाऱ्या ताडोब्याचा 'मन की बात'मध्ये उल्लेख केला. आता जिल्ह्यातील वाघांचे प्रतिनिधित्व करीत, 'आम्ही मागास नाही' अशी डरकाळी लोकसभेत फोडायची आहे, असा निर्धार राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर-वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

गांधी चौक चंद्रपूर येथे भव्य स्वागत समारंभात ते बोलत होते. यावेळी आमदार संजय रेड्डी बोदकुलवार, संदीप धुर्वे, अशोक उईके, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, महानगर भाजपचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, भाजपा ज्येष्ठ नेते चंदनसिंह चंदेल, लोकसभा प्रमुख प्रमोद कडू, देवराव भोंगळे, डॉ. मंगेश गुलवाडे, निलेश मत्ते , नितीन भटारकर, बंडू हजारे, जयप्रकाश कांबळे, राजू भगत, राजू कक्कड, प्रज्वलंत कडू, रवी बेलूरकर, संतोष पारखी, सविता कांबळे, ब्रिजभूषण पाझारे, सर्व समाजाचे धर्मगुरू, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते , नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर चंद्रपूर शहरात प्रथम आगमनानिमित्त ना. मुनगंटीवार यांचे जंगी स्वागत करण्यात आले. येथील गांधी चौकात त्यांनी चंद्रपूरकरांशी संवाद साधतांना ते म्हणाले, 'आज मी नागपूरपासून चंद्रपूरमधील गांधी चौकापर्यंत पोहोचत असताना जनतेचे प्रेम बघितले. कार्यकर्त्यांचा उत्साह बघितला आणि इथे असणाऱ्या महायुतीच्या सर्व नेत्यांचा पाठिंबाही बघितला. इथे सर्व धर्मगुरूंचा आशीर्वाद घेताना मी भारावून गेलो आहे.''मी तुमच्या आशीर्वादाच्या मोबदल्यात एकच वचन द्यायला आलेलो आहे. तुमच्या प्रेमाच्या कर्जाचे व्याज मी देईल ते फक्त आणि फक्त विकास करून. आता दिल्लीपर्यंत चंद्रपूरचा आवाज बुलंद करणार आहे. तुम्हाला मी आश्वस्त करतो की, की कन्याकुमारी ते काश्मीरपर्यंत आणि कामरूखपासून ते कच्छपर्यंत संसदेत चंद्रपूर, वणी, आर्णी लोकसभेचा आवाज हा नेहमी आघाडीवर असेन,असे ना. मुनगंटीवार म्हणाले.




### 'चंद्रपूरला कधीही विसरलो नाही'

'मी कधीच मनामध्ये काम झाले आणि विसरलो असे केले नाही. मी तीन टर्म चंद्रपूर विधानसभेचा आमदार होतो. पण चंद्रपूर विधानसभेचे प्रतिनिधित्व नसताना मात्र कदापीही चंद्रपूरला विसरलो नाही, कारण मला याची जाणीव होती की, या शहराच्या, या मतदारसंघाच्या प्रेमाचे कर्ज माझ्यावर आहे. मी बल्लारपुर चा विकास करत असताना चंद्रपूरला कधीही विसरलो नाही', असे ना. मुनगंटीवार यांनी नमूद केले.

# स्वर्ण क्रांती संघटनेच्या वतीने जागतिक महिला दिन

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानीय स्वर्ण क्रांती संघटनेच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्याचप्रमाणे विविध क्षेत्रांमध्ये नैपुण्य प्राप्त करणाऱ्या महिला, बालिका व युवतींचा सत्कार करण्यात आला.

दिनांक १५ मार्च २४ रोजी स्वर्ण क्रांती संघटना पुलगाव च्या वतीने जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला. घेतले.



कार्यक्रमांची सुरुवात सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमांचे पूजन व दिप प्रज्वलन करून करण्यात आली. वर्षा जोशी यांनी स्वागत गीत सादर केले. प्रमुख पाहुण्यांच्या स्वागता नंतर नंदा देव्हारे हा एकपात्री नाट्यप्रयोग सादर केला. चहात पेटकर हिने राणी लक्ष्मीबाई की एकपात्री भूमिका सादर केली. सेवानिवृत्त निवृत्त शिक्षिका नलिनी ढोबळे यांनी महिला दिनानिमित्त उद्बोधन केले. यावेळी बचत गटाच्या संघ अध्यक्ष, अनेक उद्योजक महिला,अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, वयोवृद्ध कलावंत, भजन मंडळ अध्यक्ष तसेच एनसीसी विद्यार्थिनी ममता बेलसरे यांचा सत्कार करण्यात आला. आर्मीच्या सामाजिक कार्यकर्त्या डॉक्टर सविता बोंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्त्या मंगला पिडीयार, ग्रामीण रुग्णालय पुलगावच्या डॉ अलका दारसिंगे, सहाय्यक चोपडे, एडवोकेट छाया धांदे, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका नलिनी ढोबळे, महिला गुन्हे अन्वेषण विभागाच्या कॉन्स्टेबल दुर्गा चव्हाण परमाल, महिला बचत गटाच्या लेखापाल रूपाली बनकर, अमरावती सामाजिक कार्यकर्त्या कविता बदनोरे, बचत गट संघ अध्यक्ष अनिता पाटील, पतंजली योग समितीच्या शोभा सतीजा उपस्थित होत्या. सर्वांनी समयोचित मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन पद्मनांच्या घोडखांदे यांनी केले. आयोजन नियोजन व आभार प्रदर्शन संघटनेच्या संस्थापिका येटीवार यांनी केले. कार्यक्रमाचे सांगता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सरिता झाम,अर्चना हाडगे, ममता बेलसरे, सुनीता मर्दाने,कीर्ती आत्राम, रजनी मोकदम, मनिषा ठाकूर, नेहा सतपाल, कविता सतपाल, निलिमा उगले, प्रेमलता हाटेकर, वेणू उगले, सुनिता उगले, बोरकर इत्यादी महिलांनी परिश्रम

# राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

निवडणुका ह्या लोकशाहीचा प्रमुख केंद्रबिंदू असून नि:पक्ष आणि मुक्त वातावरणात निवडणूक पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे. त्यासाठी सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.

### जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली राजकीय पक्षांची आढावा बैठक

जिल्हाधिकारी कार्यालयात राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. बैठकीला उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) तथा जिल्हा निवडणूक संपर्क योजना कक्षाचे नोडल अधिकारी दगडू कुंभार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा खर्च पथक नोडल अधिकारी अतुल गायकवाड, जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर आदी उपस्थित होते.केंद्रीय निवडणूक आयोगाने १६ मार्च २०२४ रोजी लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार १३ - चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची सार्वत्रिक निवडणूक १९ एप्रिल २०२४ रोजी होणार असून जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक आहे. आचारसंहितेचे कुठेही त्याचे उल्लंघन होणार नाही, याबाबत सर्वांनी काळजी घ्यावी. तसेच प्रचारादरम्यान प्रक्षोभक आणि द्वेष पसरविणारी भाषणे करू नये. पुढे जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, नामनिर्देशन पत्र दाखल करतांना उमेदवारांच्या वाहनासह जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात केवळ तीनच वाहनांना परवानगी राहील. तसेच उमेदवारासह केवळ पाचच लोकांना आतमध्ये प्रवेश दिला जाईल. राजकीय पक्षांना विविध परवानग्यांसाठी जिल्हास्तरावर तसेच विधानसभा मतदारसंघ स्तरावर 'एक खिडकी' सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय निवडणूक आयोगाच्या 'सुविधा' पोर्टलवरसुध्दा ऑनलाईन परवानगी घेता येणार आहे, असे जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी सांगितले.यावेळी खर्च पथकाचे नोडल अधिकारी अतुल गायकवाड यांनी उमेदवार आणि राजकीय पक्षांनी करावयाच्या खर्चाबाबत, नोडल अधिकारी दगडू कुंभार यांनी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याबाबत तर जिल्हा माहिती अधिकारी यांनी माध्यम प्रमाणीकरण आणि सनियंत्रण समितीबाबत मार्गदर्शन केले. या राजकीय पक्षांचे प्रतिनिधी होते उपस्थित : भारतीय जनता पक्ष, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार), शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे), आम आदमी पक्ष, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया, भारतीय रिपब्लिकन पक्ष, ऑल इंडीया रिपब्लिक पक्ष, यंग चांदा ब्रिगेड, जनसेवा गोंडवाना पाटी, एआयएमआयएम.

# तंबाकु व गुटखा तस्करी प्रकरणाची चौकशी करून तात्काळ अटक करा

## चिमूर तालुका काँग्रेसची मागणी



**चिमूर । प्रतिनिधी**

चिमुर तालुक्यात अनेक प्रकारचे बोगस, अवैध, बेकायदेशीर रेती, सटटा, बोगस तंबाकु व गुटखा यांचे व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू आहे. व या सर्व धंद्याना राजकीय सरंक्षण दिल्या जात असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोशींना तात्काळ अटक करावी अशी मागणी राष्ट्रीय काँग्रेस पक्ष चिमूर तालुका यांनी पत्रकार परिषदेतून तसेच उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

दि.१५ मार्च ला ता. सावनेर जि. नागपुर पोलीस स्टेशन हददीतील हेटी पोलीस चौकी ठिकाणी गस्त सुरू असतांना भाजपचा झेंडा लावुन असलेली एम एच ३४ बी आर १३३१ हया पांढ-या रंगाच्या अर्टिगा या गाडीची तपासणी केली असता ३ लाख १ हजार रूपयाचा तंबाकु व गुटखा व ८ लाख रूपयांची कार असा अंदाजे १२ लाख रूपयाचा माल जप्त करण्यात आला आहे. व कलम २७२,२७३,१८८ व ३२८ व अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ आणि त्या अंतर्गत नियम व नियमन २०१९ च्या कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये चिमुर शहरातील भाजपचे आमदार भांगडीया यांचे कार्यकर्ते व नंदीनी ट्रॅव्हलसचे मालक नरेंद्र हजारे, पंकज गोठे, भाजप युवा मोर्चाचे तालुका महामंत्री व खडसंगी जि.प. सर्कल प्रमुख रोशन बन्सोड यांना सुगंधीत तंबाकु व गुटखा सह मुदेमाल जप्त करून अटक करण्यात आली. परंतु रोशन बन्सोड अजूनही फरार आहे. हे सर्व चिमुर व खडसंगी परिसरातील रहिवासी आहे.सामान्य जनतेच्या जिवाशी हा खेळ अनेक वर्षा पासुन चिमूर तालुक्यात सुरू आहे. रेती तस्करी, सटटापटटी, दारूबंदीच्या काळात अवैध दारू विक्री असे अनेक अवैध व्यवसाय राजरोसपणे सुरू आहे. यामधुन मिळणारी अवैध रक्कम ही राजकारणात वापरली जात आहे. सन २०२४ च्या घोषित झालेल्या लोकसभा निवडणुकीसाठी सर्व नकली सुगंधीत तंबाकु व गुटखाचा वापर करून त्यांना प्रलोबन देऊन भाजपला मतदान करायला लावणसाठी हा साठा चिमुर तालुक्यात आणण्यात येत होता. या सर्व प्रकरणामुळे कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने चिमुर तालुका व चिमुर मतदारसंघ सुरक्षित नाही व अशा वातावरणात निवडणुका सुदधा शांततेत पार पाडणार नाही.ही बाब अत्यंत गंभीर असुन या मध्ये भाजपाच्या स्थानिक आमदाराची सुदधा चौकशी होणे आवश्यक आहे. या व्यवसायाचे धागेदोरे लांब असुन बोगस खते, बोगस तंबाकु व गुटखाच्या व्यवसाय मध्येप्रदेश मध्ये जोरात चालत आहे. कारण या ठिकाणी तंबाकु व गुटखा हा अतिशय स्वस्त दरात मिळत असल्याची माहिती आहे. चिमुर तालुक्यात विकण्यात येतो तो तंबाकु निकृष्ट दर्जाच्या आहे. जनतेच्या जिवाशी व आरोग्याशी खेळणारा हा प्रकार आहे. अशा बोगस तंबाकू व गुटखा तस्करी प्रकरणाचा छडा लावुन आरोपीची कसुन चौकशी करून टोळीचा पर्दापाश करावा, अशी मागणी पत्रकार परिषद घेऊन तसेच उपविभागीय अधिकारी चिमूर यांना निवेदन देऊन करण्यात आली. या वेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्व्यक चिमूर विधानसभा डॉ. सतिश वारजुकर, चिमूर तालुका कांग्रेस कमिटी अध्यक्ष डॉ. विजय गावंडे पाटील, चंद्रपूर जिल्हा कांग्रेस कमिटी सरचिटणीस गजानन बुटके, जेष्ठ नेते विवेक कापसे, शहर अध्यक्ष अविनाश अगडे, तालुका सचिव विजयी डाबरे, उपाध्यक्ष राजू चौधरी, उपाध्यक्ष ऍडव्होकेट . वंजारी, माजी नगरसेवक नितीन कटारे, मीडिया प्रमुख पप्पू शेख, बंडू हिवरकर, श्रीकांत गेडाम, सुधीर जुमडे, सुधीर भोयर, मंगेश घ्यार, अक्षय लांजेवार, बाळू बोबाटे, मिलिंद सहारे, रोशन नन्नावरे, उपस्थित होते.

## जिल्हाधिकाऱ्यांनी केले कलम १४४ लागू

# आदर्श आचारसंहितेचे पालन होण्यासाठी विविध बाबींवर निर्बंध

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यातील संपूर्ण कार्यक्षेत्रात आदर्श आचारसंहितेचा भंग होऊ नये तसेच तसेच आचारसंहितेचे यथायोग्य पालन होण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून जिल्हादंडाधिकारी विनय गौडा यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (१९७४ चे २) कलम १४४ मधील तरतुदीनुसार निर्बंध लागू केले आहेत. त्यानुसार



शासकीय कार्यालये / विश्रामगृहे इत्यादी परिसरात मिरवणुका काढण्यास, घोषणा देणे / सभा घेणे इत्यादीवर निर्बंध राहतील. शासकीय / निमशासकीय सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विद्रपीकरण करण्यास निर्बंध करण्यात आले आहे. उमेदवारांचे नामनिर्देशन दाखल करतेवेळी ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या / वाहने तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात व दालनात ५ व्यक्ती व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश करण्यास निर्बंध राहतील. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवाराचे नाव व चिन्ह वापरणे, आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे, तसेच निश्चित केलेल्या कागदाच्या आकाराप्रमाणे नमुना मतपत्रिका छपाईस निर्बंध आहेत.निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत व्यक्तिंची मते किंवा कृत्ये याविरुध्द निषेध व्यक्त करण्यासाठी त्यांच्या घरासमोर तसेच सार्वजनिक रहदारी / वर्दळीच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध राहतील. धार्मिक स्थळे, रुग्णालये, किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणाच्या जवळपास तात्पुरते पक्ष कार्यालय स्थापन करण्यास निर्बंध आहेत. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जाती, जमाती यांच्यातील किंवा धार्मिक वा भाषिक गटातील मतभेद अधिक तीव्र होतील किंवा त्यांच्यात तणाव निर्माण होईल, अशी कोणतीही कृती करण्यास निर्बंध आहेत.निवडणुकीच्या प्रचाराकरीता निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनावर पक्ष प्रचाराचे कापडी फलक, झेंडे लावणे इत्यादी बाबींवर निर्बंध राहतील. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सार्वजनिक जागेवर / खाजगी व्यक्तिच्या जागेवर झेंडे, भित्तीपत्रके जागा मालकाच्या व संबंधित प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय लावण्यास निर्बंध आहेत. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रचार / रॅली / रोड-शो याकरीता वाहनाच्या ताफ्यात सलग १० पेक्षा अधिक मोटार गाड्या / वाहने वापरण्यास निर्बंध राहतील. सदर आदेश जिल्हादंडाधिकारी विनय गौडा यांच्या स्वाक्षरीने आणि कोर्टाच्या शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आले आहे.

# मारवाडी ते सिमणगाव फाटा रस्त्याची दूरावस्था

**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी येथून जवळ असलेल्या मारवाडी फाटा ते सिमनगाव रस्त्याची दुरावस्था झाली असून या रस्त्यावरून वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. मारवाडी ते सिमनगाव फाटा हा तीन कि.मी. अंतराचा रस्ता असून या रस्त्यावर दोन दोन फुटाच्या अंतरावर गुडघे एवढाले खड्डे पडले आहे. दुचाकी वाहन चालवताना वाहन चालकांना त्रास सहन करावे लागत आहे तर अनेक छोटे मोठे अपघात सुद्धा या रस्त्यावर घडले आहे. तसेच सिमणगाव फाटा ते पिंपळगाव गायके हे अंदाजे तीन किमी अंतराचा रस्ता व सिमणगाव फाटा ते भांगापूर हे अंदाजे तीन किमी रस्ते असून या रस्त्यावर सुद्धा जागोजागी खड्डे पडल्याने वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे काय दिवसापूर्वीच शासनाकडून लाखो रुपये खर्च करून कान्हड भांगापूर सिमणगाव फाटा ते पिंपळगाव गायके या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे. गुत्तेदाराने या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम थातुर मातुर करून लाखो रुपयांचे बिल हडप केले असल्याची चर्चा या परिसरातील नागरिकांमधून केली जात आहे.मारवाडी ते सिमणगाव फाटा या तीन किमी अंतराच्या रस्त्याचे काम व सिमणगाव फाटा ते पिंपळगाव गायके या तीन किमी रस्त्याचे काम सिमणगाव फाटा ते भांगापूर या तीन किमी रस्त्याच्या अंतराचे काम शासनाने तात्काळ करून द्यावे अशी ग्रामस्थातून मागणी होत आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .